मुंबई विद्यापीठ

पुनर्मुल्यांकन / छायांकित प्रत विभाग,
परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/ 09 / 09 /२०१४

दिनांक :- ०१ जानेवारी, २०१४
02

## परिपत्रक

सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्था/विभाग यांचे प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, द्वितीय सत्र, २०१३ मधील काही परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत, उर्वरित परीक्षांचे निकालही जाहीर होण्यास सुरूवात झालेली आहे. यावर्षी निकालपत्रक व गुणपत्रिकाही तात्काळ पाठविल्या जाणार आहेत. तद्नंतर लगेचच पुर्नमुल्यांकनाचे व उत्तरपत्रिकेची छायांकीत ( **Revaluation & Photocopy** ) प्रत मिळणेबाबतचे अर्ज स्विकारण्यास सुरूवात होणार आहे. पुर्नमुल्यांकनाची व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळणेबाबतची संपूर्ण प्रक्रिया गतिमान होण्यासाठी गतवर्षापासून सदर कामाचे संगणकीकरण केले असून यावर्षापासुन काही मुख्य अभ्यासक्रमाच्या पुर्नमुल्यांकनाचे व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळणेबाबतचे अर्ज ऑनलाईन प्रक्रियेद्वारे स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या यादीतील परीक्षांच्या पुर्नमुल्यांकन व छायांकीत प्रतींसाठीचे अर्ज संगणकाद्वारे नोंदणी ( **Online** ) केली जाणार आहे. ऑनलाईन नोंदणी करावयाच्या अभ्यासक्रमांची यादी सोबत जोडली आहे. (सहपत्र सोबत जोडले आहे.)

ऑनलाईन नोंदणीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील **"Examinations"** या लिंकवर क्लिक करावे तद्नंतर **Application for Revaluation / Photocopy** या लिंकवर क्लिक करताच अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरू होईल. ही सर्व प्रक्रिया **Menu Driven Programme** द्वारे संचलीत केलेली असल्यामुळे नोंदणी प्रक्रियेतील क्रमवार टप्पे पूर्ण झाल्यानंतर नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल व विद्यार्थ्याच्या अर्जाची नोंद केली जाईल. नोंदणी शुल्क **Payment Gateway** च्या माध्यमातुन स्विकारले जाणार आहे. त्यामुळे, यावेळी गुणपत्रिकेची प्रत व क्रेडिट किंवा डेबिट कार्ड सोबत ठेवणे आवश्यक आहे, त्यामुळे तशा सुचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. अशाप्रकारे अर्जाची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यास कुठल्याही इंटरनेट असलेल्या संगणकावरून किंवा सायबर कॅफेमधून किंवा महाविद्यालयाच्या कार्यालयातून / संगणक कक्षातून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करता येईल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्याने सदर अर्जाची प्रिंटआऊट काढून आपला अर्ज मागासवर्गातील असल्यास जातीचा / आर्थिक मागास गटातील असल्यास ई.बी.सी. चा दाखला सोबत जोडुन आपापल्या संबंधित महाविद्यालयात जमा करावयाचा आहे. यावर्षी गुणपत्रिकेची छायांकीत प्रत जोडावयाची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी. अशाप्रकारे सर्व जमा झालेल्या अर्जाची यादी मा.कुलगुरूंचे निर्देश क्र.**VCD/4637/2010** मधील तरतुदीनुसार महाविद्यालयाने विहीत मुदतीत म्हणजेच फोटोकॉपीसाठीची यादी पुढील दहा दिवसांच्या आत व पुर्नमुल्यांकनाचे अर्जाची यादी पुढील चौदा दिवसात (कामकाजाचे दिवस) विद्यापिठाकडे सादर करावयाची आहे.

संगणकाद्वारे ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया विहीत मुदतीत दिवसरात्र सूरू राहणार असून सदर ऑनलाईन सुविधा विहित केलेल्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६.00 वा. आपोआप बंद होणार असून तदनंतर कुठल्याही परिस्थितीत व कुठल्याही कारणास्तव अर्ज स्विकारले जाणार नाहीत. त्याचप्रमाणे उपरोक्त अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जच स्विकारण्यात येणार असून जून्या पध्दतीचे ( **Offline** ) लिखीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुंबई विद्यापीठ

पुनर्मुल्यांकन / छायांकित प्रत विभाग,
परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०० ०९८.

यावर्षी ही सुविधा फक्त सोबतच्या यादीमध्ये निर्देशित केलेल्या अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे पुर्नमुल्यांकन व उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत मिळण्यासाठी सूरू केलेली असून यादीमध्ये उल्लेख नसलेल्या इतर सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी जून्या पद्धतीने लेखी ( **Offline** ) अर्ज सादर करावयाचे आहेत, याचीही कृपया नोंद घ्यावी. यावेळी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या छायांकीत प्रत विद्यार्थ्यांच्या ईमेलवर पाठविण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला सुरू असलेला **(Valid & Active)** ई-मेल द्यावयाचा आहे. विद्यार्थ्याने छायांकीत प्रतीसाठी अर्ज केल्यानंतर सर्वसाधारणपणे त्यास दोन आठवडयात छायांकीत प्रत ईमेलद्वारे / पत्रकाद्वारे पाठविली जाणार आहे. छायांकीत प्रत मिळाली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी आपापला ईमेल नियमितरित्या पाहण्यात यावा अशा सुचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे आपल्या अर्जाची स्थिती ( **Status** ) देखील **SMS** द्वारे कळविण्याचे प्रस्तावित आहे, त्यामुळे आपला सुरू असलेला मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी. ही संपूर्ण **Online** नोंदणीची प्रक्रिया अत्यंत सोपी असून संगणक साक्षर असलेल्या कुणाही विद्यार्थ्याला करता येईल. मात्र तरीही काही अडचणी असल्यास संबंधीत महाविद्यालयातील संगणक केंद्रामधुन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना सहकार्य करावे. विद्यार्थ्याने संपूर्ण भरलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढावी व त्यासोबत मागास वर्गीय किंवा आर्थिक मागासवर्गीय गटातील असल्यास जातीचा/आर्थिक मागास गटातील असल्याबाबतचा दाखल्याची छायांकीत प्रत जोडून महाविद्यालयास सादर करावी. यावर्षापासून गुणपत्रिकेची प्रत जोडावयाची नाही याची पुन्हा एकदा नोंद घ्यावी.

महाविद्यालयाने सर्व अर्जदार विद्यार्थ्यांची यादी (पूर्नमुल्यांकन व छायांकीत प्रतीसाठी दोन स्वतंत्र याद्या) तयार करून व सदर यादीमध्ये मागासवर्गीय / आर्थिक मागास गटातील विद्यार्थी असल्याबाबत त्या त्या विद्यार्थ्यांच्या नावासमोर स्पष्ट शेरा मारून अशी यादी विद्यापीठास विहीत मुदतीत पाठविणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार नाही अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने आपापल्या संबंधीत महाविद्यालयामध्ये अर्ज भरण्याची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात यावी.

सदर अर्ज स्विकारण्यासाठी वेळोवेळी संकेतस्थळावर दिलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध केलेली आहे. या कालावधीत सदर सुविधा पुर्ण वेळ सुरू राहणार आहे. सदर वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे. ते वेळोवेळी पाहण्यात यावे. तसेच महाविद्यालयाने त्याची प्रत सुचना फलकावर प्रदर्शीत करावी. मात्र सदर सुविधा अभ्यासक्रम निहाय शेवटच्या दिवशी सायंकाळी ६.०० वा. आपोआप बंद होणार आहे याची कृपया नोंद घ्यावी. **Online** नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी कुठल्याही चौकशीसाठी विद्यापिठात येऊ नये. त्यांची पुर्नमुल्यांकनाबाबत / छायांकीत प्रतीबाबत काहीही तक्रार असल्यास ( **dr.revaluation@rediffmail.com** ) या ईमेलद्वारे तक्रार दाखल करावी. सदर तक्रारीचे उत्तर निद्यार्थ्याच्या नोंदणी केलेल्या ईमेलवर पाठविले जाईल.

सदर परिपत्रकास सर्वकष प्रसिद्धी देऊन उपरोक्त यादीतील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे अर्ज **Online** भरण्यास प्रोत्साहन द्यावे व परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. अर्ज नोंदणीबाबत काही शंका असल्यास ०२२ - २६५४३४०३ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

( डॉ. पद्मा देशमुख )
परीक्षा नियंत्रक

सोबत ः- सहपत्र ( यादी )

D:/Com 2/2013/ Letter/Marathi Letters/ Revaluation Lettere

# University of Mumbai

For SECOND HALF 2013

| Sr. No. | Program No. | Faculty and Courses | Date of declaration of Result | Online Forms acceptance starting Date | Online Forms acceptance Last date |
|---|---|---|---|---|---|
| | | **FACULTY OF ARTS** | | | |
| 1 | | T.Y.B.A. | | | |
| 2 | | B.Ed (Sem - I & II ) | | | |
| 3 | | B. Ed Degree | | | |
| 4 | | B.M.M. ( Sem - V & VI ) | | | |
| 5 | | M.A. (Part - I & II ) | | | |
| 6 | | M.A. (Part -I ) ( Sem - I & II ) | | | |
| 7 | | M.A. (Part - II ) ( Sem - III & IV ) | | | |
| | | | | | |
| | | **FACULTY OF COMMERCE** | | | |
| 8 | | T.Y.B.Com. | | | |
| 9 | | B.M.S. ( Sem - V & VI ) | | | |
| 10 | | T.Y.B.Com ( B & I ) ( Sem - V & VI ) | | | |
| 11 | | T.Y.B. Com ( A & F ) ( Sem - V & VI ) | | | |
| 12 | | T.Y.B.Com ( F.M. ) ( Sem - V & VI ) | | | |
| 13 | | M. Com ( Part - I,& II ) | | | |
| 14 | | M. Com ( part - II ) ( Sem - I & II ) | | | |
| 15 | | M. Com ( Part - II ) ( Sem - III & IV ) | | | |
| 16 | | M.M.S. ( Sem -IV ) | | | |
| | | | | | |
| | | **FACULTY OF SCIENCE** | | | |
| 17 | | T.Y.B.Sc. Regular & Sem Pattern | | | |
| 18 | | B. Sc ( IT) ( Sem - V & VI ) | | | |
| 19 | | M.Sc (Part - I ) ( Sem - I & II ) | | | |
| 20 | | M.Sc ( Part - II ) ( Sem - III & IV ) | | | |
| | | | | | |
| | | **FACULTY OF LAW** | | | |
| 21 | | LL.B ( Sem - I to VI ) | | | |
| 22 | | LL.B / BLS ( Sem - V & X ) | | | |
| 23 | | LLM ( Sem - I & IV ) | | | |
| | | | | | |
| | | **FACULTY OF TECHNOLOGY** | | | |
| 24 | | B. Pharm. Sem I, II & VII, VIII | | | |
| 25 | | Third Year B. Arch | | | |
| 26 | | Fourth Year B. Arch | | | |
| 27 | | M.C.A. Sem - ! To V ( OLD ) | | | |
| 28 | | M.C.A. Sem - I To III ( CBS ) | | | |
| 29 | | F.E. ( I & II ) | | | |
| 30 | | B.E. ( VII & VIII ) | | | |
| 31 | | M.E. ( Sem - I & II ) | | | |